दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २२ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १७६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

रविवार दि. २२ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, चतुर्थी रात्री ९-१७ पर्यंत, दिवस नक्षत्र–भरणी रात्री १०-४३ पर्यंत
चंद्र रास- मेष रात्री ४-१४ पर्यंत नंतर वृषभ, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन*

### कचऱ्यातून गॅस निर्मिती

**सातारा** : साताऱ्यात गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर कचऱ्यातून गॅस निर्मितीचा अभिनव प्रयोग राबवण्यात आला आहे. राजघराण्यातील स्नुषा व 'कर्तव्य सोशल ग्रुप'च्या अध्यक्षा वेदांतिकाराजे भोसले यांनी आपल्या निवासस्थानी बायोगॅस युनिट उभारून स्वयंपाकघरातील कचऱ्यापासून गॅस तयार करण्यास सुरुवात केली आहे. या प्रयोगामुळे घरगुती गरजा भागविण्यास मदत होत आहे.

## सारांश वृत्त

### जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा पुन्हा रंगल्या

**मुंबई** : गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा वारंवार समोर येत आहेत. यापूर्वी त्यांनी स्वतः या चर्चांना फेटाळले होते. मात्र, माजी खासदार संजयकाका पाटील आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या ताज्या वक्तव्यांमुळे या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात असून, सर्वांचे लक्ष जयंत पाटील यांच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

### खरात प्रकरणात चाकणकरांचे स्पष्टीकरण

**मुंबई** : नाशिकमधील अंकशास्त्रज्ञ अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील राजकारण तापले असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर आरोपांवर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सुषमा अंधारे यांनी केलेला अमावास्येला बोट कापल्याचा आरोप पूर्णपणे फेटाळून लावला. चाकणकर म्हणाल्या की, सोशल मीडियावर व्हायरल झालेले फोटो चुकीच्या तारखांसह सादर करण्यात आले आहेत. "हे फोटो १२ सप्टेंबरचे असून ते २ सप्टेंबरचे असल्याचा चुकीचा दावा करण्यात आला," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी विविध तारखांचे फोटो दाखवत आपल्या हाताला कुठेही जखम नसल्याचे सांगितले. दरम्यान, या प्रकरणात चुकीची माहिती पसरवणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देत, मूळ आरोपी अशोक खरातवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

### तातडीने मूल्यांकनाचे निर्देश; केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची उच्चस्तरीय बैठक

# अवकाळीमुळे पिकांचे मोठे नुकसान!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. गहू, हरभरा, मका यांसारख्या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीतील कृषी भवन येथे उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत देशभरातील शेती परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीनंतर कृषिमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पीक नुकसानीचे तातडीने आणि वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना त्वरित मदत पोहोचविणे, विमा दावे लवकर निकाली काढणे आणि मदत यंत्रणांचा समन्वय वाढविणे यावर विशेष भर देण्यात आला आहे.

कृषिमंत्री चौहान यांनी स्पष्ट केले की, सरकारचे लक्ष केवळ उत्पादनवाढीपुरते मर्यादित नसून शेतकऱ्यांचे नुकसान कमी करणे आणि त्यांना वेळेवर भरपाई देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. "पीक नुकसानीचे अचूक मूल्यांकन करून विमा दावे योग्य प्रकारे निकाली काढले जातील. कोणत्याही शेतकऱ्याला भरपाईसाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

अनेक राज्यांमध्ये गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित भागांत तात्काळ सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्वरित घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची नोंद करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

याशिवाय, किमान आधारभूत किंमत अंतर्गत पिकांची खरेदी सुरळीतपणे सुरू राहावी, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा, यासाठी खरेदी केंद्रांमध्ये कोणतीही अडचण येऊ नये, यावरही भर देण्यात आला आहे.

कृषिमंत्र्यांनी सर्व संबंधित विभागांना राज्य सरकारांशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. पीक कापणी प्रयोग योग्य पद्धतीने पार पाडून नुकसानीचे अचूक मूल्यांकन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच हवामानाशी संबंधित जोखीम, पिकांची सद्यस्थिती, खरेदीची तयारी आणि मदत यंत्रणा यामध्ये अधिक समन्वय साधण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एकूणच, अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार सक्रिय झाले असून, लवकरच प्रत्यक्ष मदतीचे परिणाम दिसून येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चाकणकरांचा राजीनामा; महिला आयोगाचे पद राष्ट्रवादीकडेच?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : नाशिकमधील भोंदू 'कॅप्टन' अशोक खरात प्रकरणाने राज्यात मोठी खळबळ उडवली असताना त्याचे राजकीय पडसाद उमटू लागले आहेत. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर आता त्यांच्या जागी कोणाची नियुक्ती होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप असून, त्यासंदर्भातील काही व्हिडिओ आणि फोटोही समोर आल्याने प्रकरण अधिकच गाजले. या पार्श्वभूमीवर चाकणकर या काही धार्मिक कार्यक्रमांत खरातसोबत दिसल्याने त्यांच्यावर टीका झाली आणि अखेर त्यांनी पद सोडले. दरम्यान, महिला आयोगाचे अध्यक्षपद पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या पदासाठी दोन महिला नेत्यांची नावे चर्चेत आहेत. पुण्यातील वैशाली नागवडे आणि उत्तर महाराष्ट्रातील प्रतिशा शिंदे यांची नावे पुढे आली असून, यापैकी एका नावावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

मात्र, अद्याप अधिकृत निर्णय जाहीर झालेला नसल्याने या नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशोक खरात प्रकरणामुळे निर्माण झालेल्या वातावरणात महिला आयोगाच्या नव्या नेतृत्वावर मोठी जबाबदारी असणार असल्याचेही स्पष्ट होत आहे.

## अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारतात वादळी पावसाची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिमी विक्षोभामुळे अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारत अशा तीन देशांच्या सीमा ओलांडणारा तब्बल १,००० किलोमीटर लांबीचा पावसाचा पट्टा तयार झाला आहे. यामुळे मार्च महिन्यातच मे महिन्यासारखी उष्णता अनुभवणाऱ्या जनतेला दिलासा मिळणार आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, साधारणपणे पश्चिमी चक्रावात किंवा विक्षोभ हे वक्राकार असतात. मात्र, यंदाचा हा कमी दाबाचा पट्टा एका सरळ रेषेत असून तो हजारो किलोमीटरपर्यंत पसरला आहे. अशा प्रकारची सरळ रचना अत्यंत दुर्मीळ मानली जाते. या रचनेमुळे ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट व सोसाट्याचा वारा यांसह वादळी पावसाची निर्मिती होत आहे, ज्याचा अनुभव सध्या उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये येत आहे. पश्चिमी विक्षोभ साधारणपणे हिवाळ्याच्या काळात पश्चिम दिशेकडून पाऊस आणि बर्फवृष्टी घेऊन येतात. ही हजारो किमी मार्गावर सरळ रेषेत पसरलेली नवी प्रणाली तिच्या वेगळ्या आकारामुळे आणि यंदा मार्चमध्येच तापलेल्या प्रदेशांना काही प्रमाणात दिलासा देणारी ठरू शकते. एरवी वक्राकार असणारी ही प्रणाली इतक्या मोठ्या अंतरापर्यंत सरळ रेषेत असणे हे वातावरणातील 'जेट स्ट्रीम' मधील बदलांमुळे असू शकते. हवामान बदलाचा संकेतही मानण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीसह उत्तर भारतात पारा ३७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला होता. ऐन मार्चमध्येच उन्हाळ्याच्या झळा बसू लागल्याने नागरिक हैराण झाले होते.

### महागाई वाढीचा इशारा; इंधन दरवाढीची शक्यता व्यक्त

# रुपयाच्या घसरणीवरून राहुल गांधी यांचा केंद्रावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील रुपयाची सातत्याने होत असलेली घसरण आणि पश्चिम आशियातील वाढता तणाव यामुळे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असताना, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. सरकारकडे ठोस आर्थिक धोरण नसून, केवळ भाषणबाजी सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये नमूद केले की, रुपया डॉलरच्या तुलनेत झपाट्याने घसरत असून १०० रुपयांच्या दिशेने वाटचाल करत आहे. औद्योगिक इंधनाच्या किमती



वाढत असल्याने उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार आहे. याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होऊन दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे म्हटले की, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसेल. उत्पादन महागल्याने उद्योगांची स्पर्धात्मकता कमी होईल आणि रोजगारावरही परिणाम होऊ शकतो. तसेच परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास कमी झाल्यास त्यांचा पैसा बाजारातून बाहेर पडू शकतो, ज्यामुळे शेअर बाजारावरही दबाव वाढण्याची शक्यता आहे.

"ही केवळ आकडेवारी नाही, तर सामान्य नागरिकांच्या आयुष्यावर होणाऱ्या परिणामाचे संकेत आहेत. प्रत्येक कुटुंबाच्या खर्चात वाढ होणार असून, महागाईचा मोठा फटका बसणार आहे," असे राहुल गांधी यांनी नमूद केले. त्यांनी असा दावाही केला की, विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे.

"मोदी सरकारकडे कोणतीही स्पष्ट दिशा किंवा दीर्घकालीन रणनीती नाही. फक्त पोकळ आश्वासने आणि भाषणबाजी केली जात आहे. सरकार काय सांगते हे महत्त्वाचे नाही, तर नागरिकांच्या ताटात काय उरते हा खरा प्रश्न आहे," असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनीही या परिस्थितीवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, इराण-अमेरिका संघर्ष तीव्र झाल्यास भारताच्या ऊर्जा सुरक्षेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. भारत मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेतील कच्च्या तेलावर अवलंबून असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांचा थेट परिणाम देशावर होईल.


ऊर्जेअभावी उत्पादन, वाहतूक आणि व्यापार व्यवस्था विस्कळीत होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. सरकारने तातडीने ठोस उपाययोजना करून अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### कालीचरण महाराजांच्या वादग्रस्त वक्तव्याने नवा वाद

# भर चौकात गोळ्या घातल्या पाहिजेत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**धाराशिव** : नाशिकमधील भोंदू 'कॅप्टन' अशोक खरात प्रकरणाने राज्यभर खळबळ उडवली असताना या प्रकरणावर कालीचरण महाराज यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. धाराशिव येथील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी अशा भोंदू बाबांना "भर चौकात गोळ्या घातल्या पाहिजेत" असे विधान करत संताप व्यक्त केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे धार्मिक व सामाजिक वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.



कालीचरण महाराज यांनी पुढे सांगितले की, समाजच एखाद्याला 'महाराज' बनवतो; मात्र तेच लोक धर्माला कलंक लावत असतील, तर त्यांना माफी नसावी. त्यांनी धर्मकार्य आणि पैशांबाबतही मत मांडत "धर्मकार्य करणाऱ्यांनी पैसे घेऊ नयेत असा कोणताही नियम नाही," असे स्पष्ट केले.

दरम्यान, अशोक खरात यांच्यावर अंकशास्त्र व दैवी शक्तींच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक आणि अंधश्रद्धा पसरवल्याचे गंभीर आरोप आहेत. पोलिसांनी त्याला अटक केली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (SIT) नेमण्यात आले आहे. महिला IPS अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे. तपासादरम्यान खरातच्या पेनड्राइव्हमध्ये 58 व्हिडिओ सापडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे राज्यात अंधश्रद्धा आणि भोंदू बाबांविरोधात संतापाची लाट उसळली आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा घटनांमुळे समाजात जागरूकता निर्माण करण्याची आणि कठोर कायदेशीर कारवाईची गरज अधिक तीव्र झाली आहे.

### मुंबई मनपातील संभाव्य घोटाळ्यांवर भाजपचा प्रहार

**मुंबई:** मुंबई महानगरपालिकेतील संभाव्य घोटाळ्यांच्या पार्श्वभूमीवर भाजपने कंत्राट प्रक्रियेवर जोरदार आक्षेप घेत विविध निविदा रद्द करण्यास भाग पाडले आहे. शालेय साहित्य, राणीबाग प्रकल्पानंतर आता रस्त्यांवरील थर्मोप्लास्टिक पेंटिंगसाठी काढलेली १५० कोटी रुपयांची निविदाही रद्द करण्यात आली.

भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी निविदेतील अनियमितता, अपारदर्शकता आणि कार्टेलायझेशनचा संशय व्यक्त करत कारवाईची मागणी केली होती.

## 1 एप्रिलपासून नवा आयकर कायदा; 'प्रारंभ 2026' मोहिमेद्वारे जनजागृतीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : 1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नव्या प्राप्तिकर कायद्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने 'प्रारंभ 2026' ही जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत कर नियम सर्वसामान्यांना सोप्या भाषेत समजावून सांगण्यावर भर दिला जाणार असून, कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचा सरकारचा उद्देश आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यासोबतच 'आयकर वेबसाइट 2.0' हे



नवीन ई-फायलिंग पोर्टलही सुरू करण्यात आले आहे, ज्यामुळे कर भरणे अधिक सोपे, जलद आणि पारदर्शक होणार आहे. पगारदार, छोटे व्यावसायिक आणि उद्योजकांसाठी हा बदल महत्त्वाचा ठरणार आहे.

'प्रारंभ 2026' मोहिमेद्वारे प्रिंट, टीव्ही, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांतून व्यापक प्रचार केला जाणार आहे. विविध भाषांमध्ये मार्गदर्शक व्हिडिओ, माहितीपत्रके आणि FAQ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. देशभरात 300 हून अधिक कार्यशाळांचे आयोजन करून नागरिकांना थेट मार्गदर्शन दिले जाणार आहे.

महसूल सचिव अरविंद श्रीवास्तव यांच्या मते, नवीन कायदा अधिक वापरकर्ता-अनुकूल असून, विवाद कमी करून करदात्यांचा विश्वास वाढवण्यावर भर आहे. सरकारचा 'नागरिक देवो भव' हा दृष्टिकोन लक्षात घेऊन ही मोहीम राबवली जात आहे.

### २७,८४० थकबाकीदारांनी घेतला लाभ; ३१ मार्चपर्यंत ९०% दंडमाफीची संधी

# अभय योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद; २० दिवसांत ८० कोटींहून अधिक वसुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने लागू केलेल्या 'अभय योजना'ला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून, अवघ्या २० दिवसांत तब्बल २७ हजार ८४० मालमत्ता कर थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या माध्यमातून ८० कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कर वसूल झाला आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ (मध्यरात्री १२ वाजेपर्यंत) लागू राहणार असून, उर्वरित थकबाकीदारांनीही या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.




महानगरपालिकेने १ मार्च २०२६ पासून अभय योजना लागू केली. या योजनेअंतर्गत निवासी, अनिवासी, औद्योगिक तसेच रिक्त मालमत्तांच्या थकबाकीवर एकरकमी भरणा केल्यास दंडावरील ९० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. ही सवलत मिळवण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी ३१ मार्चपूर्वी भरणे आवश्यक आहे. १ मार्च ते २० मार्च २०२६ या कालावधीत २७,८४० मालमत्ता



धारकांनी कर भरून ८० कोटींपेक्षा अधिक रक्कम जमा केली आहे. या प्रक्रियेत तब्बल १९ कोटी १५ लाख रुपयांची दंडसवलत देण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ५ लाखांहून अधिक मालमत्ता धारकांनी ८३० कोटी ५ लाख रुपयांचा कर भरला आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे. दरम्यान, काही मालमत्ता धारकांनी अद्याप कर भरलेला नसल्याने त्यांना शेवटच्या तारखेपूर्वी थकबाकी एकरकमी भरून ९० टक्के दंडमाफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, "अभय योजनेला मिळणारा प्रतिसाद हा नागरिकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. ही योजना आर्थिक दिलासा देणारी असून, उर्वरित थकबाकीदारांनीही वेळेत कर भरून लाभ घ्यावा."

महापौर रवि लांडगे यांनीही नागरिकांना आवाहन करत सांगितले की, "ही योजना नागरिकांसाठी मोठा दिलासा आहे. थकबाकीदारांनी ३१ मार्चपूर्वी कर भरून दंडावरील मोठ्या सवलतीचा फायदा घ्यावा."

#### सुट्टीच्या दिवशीही केंद्रे सुरू

- नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने शनिवार-रविवार तसेच २१ मार्च (रमजान ईद), २६ मार्च (श्रीराम नवमी) आणि ३१ मार्च (महावीर जयंती) या सार्वजनिक सुट्ट्यांमध्येही कर संकलन केंद्रे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कामगार वर्ग व सर्वसामान्य नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरणे सुलभ होणार आहे. सर्व कर संकलन केंद्रे कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहतील.

## विषारी औषध टाकून 7 भटक्या कुत्र्यांची हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डोंबिवली** : डोंबिवलीजवळील धामटण गाव परिसरात भटक्या कुत्र्यांना विष देऊन मारल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. उंदीर मारण्याचे विषारी औषध टाकून सात भटक्या कुत्र्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात एकलव्य ॲनिमल्स पेडिग्री कंपनीचे मालक वीरेंद्र कुमार निषाद, त्यांचा भाऊ आणि काही कामगारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



प्राणीप्रेमी कार्यकर्त्या सुचित्रा सुर्वे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी 12 मार्चपासून परिसरात विषारी पावडर टाकण्यास सुरुवात केली. ही पावडर खाल्ल्याने सुरुवातीला चार आणि नंतर आणखी तीन अशा एकूण सात कुत्र्यांचा मृत्यू झाला. याआधीही अशाच प्रकारे अनेक भटक्या व पाळीव कुत्र्यांचा जीव घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांना विरोध केल्यावर आरोपींनी धमकी दिल्याचेही समोर आले आहे. पोलिसांनी मृत श्वानांचे शव पोस्टमॉर्टमसाठी पाठवले असून अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. या घटनेमुळे प्राणी संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## संपादकीय

# अंधश्रद्धेच्या विळख्यात समाज: ‘कॅप्टन’ प्रकरणाने दिलेला इशारा

**महाराष्ट्रात उघडकीस आलेल्या तथाकथित ‘कॅप्टन’ अशोक खरात प्रकरणाने केवळ एका व्यक्तीचा पर्दाफाश केला नाही, तर समाजातील अंधश्रद्धेची खोलवर रुजलेली मानसिकता उघडी पाडली आहे.**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात जग पुढे जात असताना, दुसऱ्या बाजूला अंधविश्वासाच्या आधारावर लोकांची फसवणूक होत राहणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. ही केवळ एका भोंदू व्यक्तीची कथा नसून, ती समाजातील भीती, अज्ञान आणि भावनिक कमकुवतपणाचे प्रतिबिंब आहे. आजही अनेक लोक आपल्या वैयक्तिक अडचणी, आरोग्याच्या समस्या, आर्थिक संकट किंवा कौटुंबिक तणाव यावर उपाय शोधताना वैज्ञानिक दृष्टिकोन न वापरता तथाकथित “दैवी शक्ती” किंवा “चमत्कारिक उपायां”कडे वळतात. भोंदू लोक याच मानसिकतेचा फायदा घेतात. ते लोकांच्या मनात भीती निर्माण करतात—“तुमच्यावर संकट आहे”, “विशेष पूजा केली नाही तर नुकसान होईल”—अशा प्रकारच्या विधानांनी ते व्यक्तीला मानसिकदृष्ट्या कमकुवत करतात आणि स्वतःवर विश्वास ठेवायला भाग पाडतात.

अशोक खरातसारखे लोक स्वतःला ‘तज्ज्ञ’, ‘गुरू’ किंवा ‘दैवी शक्ती असलेली व्यक्ती’ म्हणून सादर करतात. त्यांच्या बोलण्यामध्ये आत्मविश्वास असतो, बाह्य व्यक्तिमत्त्व प्रभावी असते आणि काही वेळा ते उच्चभ्रू वर्गातही वावरत असल्याने त्यांच्यावर सहज विश्वास ठेवला जातो. विशेष म्हणजे, समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, राजकारणी किंवा व्यावसायिक देखील त्यांच्या जाळ्यात अडकतात. यामुळे सामान्य लोकांमध्ये असा समज निर्माण होतो की ही व्यक्ती खरोखरच प्रभावी आहे, आणि यामुळे भोंदूगिरीला अधिक खतपाणी मिळते.

या प्रकरणात समोर आलेले महिलांच्या शोषणाचे आरोप अधिक गंभीर आहेत. श्रद्धेच्या नावाखाली विश्वास संपादन करून त्याचा गैरफायदा घेणे ही भोंदूगिरीची अत्यंत धोकादायक बाजू आहे. अशा घटनांमुळे केवळ पीडित व्यक्तीच नाही, तर संपूर्ण समाजातील विश्वासाचे नाते कमकुवत होते. श्रद्धा ही सकारात्मक असू शकते, परंतु जेव्हा ती विवेकशून्य होते, तेव्हा ती विनाशकारी ठरते.

येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो—भोंदू तयार होतात की आपण त्यांना तयार करतो? वस्तुस्थिती अशी आहे की भोंदू व्यक्ती स्वतःहून निर्माण होत नाहीत; त्यांना समाजातील अंधश्रद्धा आणि भीतीच वाढवते. जेव्हा लोक विज्ञानापेक्षा अंधविश्वासावर अधिक भर देतात, तेव्हा अशा व्यक्तींना संधी मिळते. त्यामुळे या समस्येचा मूळ शोध घ्यायचा असेल, तर समाजाच्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. धर्म आणि अंधश्रद्धा यामध्ये स्पष्ट फरक आहे. धर्म हा नैतिकता, मूल्ये आणि सकारात्मकतेवर आधारित असतो, तर अंधश्रद्धा ही भीती आणि अज्ञानावर आधारलेली असते. दुर्दैवाने, अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत होते. लोक धार्मिक भावनांच्या नावाखाली कोणत्याही गोष्टीवर आंधळा विश्वास ठेवतात, आणि याचाच फायदा भोंदू घेतात. त्यामुळे धर्माचे आकलन तर्कशुद्ध पद्धतीने होणे गरजेचे आहे.

शिक्षणाचा अभाव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची कमतरता ही देखील अंधश्रद्धा वाढण्याची मोठी कारणे आहेत. अनेक लोकांना मूलभूत विज्ञान, तर्कशक्ती आणि विचार करण्याची सवय नसल्यामुळे ते सहजपणे कोणत्याही दाव्यावर विश्वास ठेवतात. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत केवळ माहिती देण्यावर नव्हे, तर विचार करण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. मुलांना लहानपणापासून प्रश्न विचारण्याची सवय लावली, तर भविष्यात ते कोणत्याही भ्रामक गोष्टीला सहज बळी पडणार नाहीत. याशिवाय, भावनिक असुरक्षितता देखील भोंदूगिरीला चालना देते. जेव्हा एखादी व्यक्ती संकटात असते, तेव्हा ती कोणत्याही प्रकारच्या आशेच्या शोधात असते. अशा वेळी तर्कशुद्ध विचार बाजूला पडतो आणि ‘चमत्कार’ यावर विश्वास वाढतो. त्यामुळे समाजात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सत्ताधाऱ्यांची भूमिका देखील येथे महत्त्वाची ठरते. काही वेळा भोंदू व्यक्तींना राजकीय किंवा सामाजिक पाठिंबा मिळतो, ज्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यास उशीर होतो. यामुळे समाजात चुकीचा संदेश जातो की अशा प्रकारांना अप्रत्यक्ष मान्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा अस्तित्वात आहे, परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. केवळ कायदे बनवून चालत नाही, तर त्याची अंमलबजावणी आणि जनजागृतीही तितकीच महत्त्वाची आहे. लोकांनी स्वतःहून जागरूक होणे, प्रश्न विचारणे आणि सत्य शोधण्याची सवय लावणे आवश्यक आहे. माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. भोंदूगिरीचा पर्दाफाश करून जनतेसमोर सत्य मांडणे ही माध्यमांची जबाबदारी आहे. त्याचबरोबर, अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती आणि कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवणेही आवश्यक आहे. माध्यमांनी केवळ बातमी देण्यापुरते मर्यादित न राहता समाजात सकारात्मक विचार रुजवण्याचे कार्य केले पाहिजे. शेवटी, अंधश्रद्धा ही केवळ कायद्याने थांबवता येणारी समस्या नाही. ती एक सामाजिक आणि मानसिक समस्या आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या श्रद्धेचा आणि विवेकाचा समतोल साधणे आवश्यक आहे. श्रद्धा ठेवणे चुकीचे नाही, परंतु ती आंधळी नसावी. कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची पडताळणी करणे, प्रश्न विचारणे आणि तर्कशुद्ध विचार करणे हीच खरी गरज आहे.

# तालिबान, टीटीपी आणि सीमावादाच्या विळख्यात अडकलेला पाकिस्तान

या पार्श्वभूमीवर आजची परिस्थिती समजून घेताना इतिहास, राजकारण आणि सुरक्षा या सर्व घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. अफगाणिस्तानातील सत्तासंघर्षात प्रभाव राखण्यासाठी पाकिस्तानने दीर्घकाळ तालिबानला पाठिंबा दिला. सोव्हिएत संघाच्या आक्रमणाच्या काळात अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांच्या मदतीने मुजाहिदीनना बळ देण्यात आले, त्यातूनच पुढे तालिबानचा उदय झाला. पाकिस्तानने या गटांना प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि आश्रय देत अफगाणिस्तानात ‘मित्रवत’ सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या धोरणामागे ‘रणनीतिक खोली’ ही संकल्पना होती, ज्यामुळे भारताविरुद्धच्या संभाव्य संघर्षात पाकिस्तानला भौगोलिक फायदा मिळेल, असा त्यांचा विश्वास होता.

मात्र, हीच नीती पुढे पाकिस्तानसाठी घातक ठरली. तालिबानच्या विचारसरणीतून प्रेरित होऊन Tehrik-i-Taliban Pakistan (टीटीपी) या संघटनेचा उदय झाला. ही संघटना अफगाण तालिबानशी वैचारिकदृष्ट्या जवळीक असली तरी तिचे लक्ष्य पाकिस्तान राज्य आहे. गेल्या काही वर्षांत टीटीपीने पाकिस्तानमध्ये अनेक भीषण दहशतवादी हल्ले घडवून आणले आहेत. पेशावरमधील शाळेवर झालेला हल्ला, लष्करी तळांवरील हल्ले आणि पोलीस ठाण्यांवरील कारवाया यामुळे पाकिस्तानची अंतर्गत सुरक्षा ढासळली आहे.

2021 मध्ये अफगाणिस्तानात तालिबान सत्तेत आल्यानंतर पाकिस्तानला अपेक्षा होती की, तालिबान टीटीपीविरुद्ध कठोर कारवाई करेल. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती उलट झाली. अफगाण तालिबानने टीटीपीविरोधात निर्णायक भूमिका घेतली नाही. उलट, अनेक अहवालांनुसार टीटीपीला अफगाणिस्तानात आश्रय मिळत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पाकिस्तानमधील दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली.

या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने सीमापार कारवाया करण्यास सुरुवात केली. काही वेळा हवाई हल्ले आणि लष्करी कारवायांमुळे अफगाणिस्तानातील नागरिकांनाही फटका बसला. परिणामी, दोन्ही देशांतील संबंध अधिकच ताणले गेले. तालिबान सरकारने पाकिस्तानच्या कारवायांवर तीव्र आक्षेप घेतला



» **पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील सध्याचा संघर्ष हा फक्त सीमावाद किंवा तात्पुरता तणाव नाही, तर तो अनेक दशकांपासून राबवलेल्या चुकीच्या धोरणांचा परिणाम आहे. दहशतवादी संघटनांना ‘रणनीतिक मालमत्ता’ म्हणून वापरण्याची पाकिस्तानची नीती आता त्याच्याच अडचणीचे मूळ बनली आहे.**

आणि दोन्ही देशांमध्ये तणाव वाढत गेला.

या संघर्षामागे ‘ड्युरंड रेषा’ हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. 1893 मध्ये आखलेली ही सीमा पाकिस्तान मान्य करतो, मात्र अफगाणिस्तानने ती कधीही औपचारिकपणे स्वीकारलेली नाही. त्यामुळे सीमावाद कायम आहे. या सीमाभागात अनेक पश्तून समुदाय राहतात, ज्यांचे सांस्कृतिक आणि सामाजिक संबंध दोन्ही देशांमध्ये पसरलेले आहेत. या परिस्थितीचा फायदा दहशतवादी संघटनांनी घेतला असून, त्यांनी या भागात आपले मजबूत जाळे निर्माण केले आहे. या सर्व घडामोडींमध्ये एक महत्त्वाचा संदर्भ म्हणजे अमेरिकेच्या माजी परराष्ट्रमंत्री यांनी केलेले विधान. त्यांनी पाकिस्तानला इशारा देताना म्हटले होते—“तुम्ही तुमच्या अंगणात साप पाळून ते फक्त शेजाऱ्यांनाच डसतील, अशी अपेक्षा करू शकत नाही.” आजच्या परिस्थितीत हे विधान अक्षरशः खरे ठरताना दिसत आहे. पाकिस्तानने दहशतवादी गटांना वापरण्याची जी नीती स्वीकारली, तीच आता त्याच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका बनली आहे.

पाकिस्तानसमोर आज मोठे आव्हान उभे आहे—धोरणात्मक बदलाचे. अनेक वर्षे चालत आलेली ‘दुहेरी नीती’ आता टिकवणे शक्य नाही. एकीकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाविरोधी भूमिका मांडणे आणि दुसरीकडे काही गटांना पाठिंबा देणे, ही भूमिका उघड झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळली असून, जागतिक स्तरावर त्याच्यावर दबाव वाढत आहे. याशिवाय, या संघर्षाचा आर्थिक परिणामही गंभीर आहे. आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या पाकिस्तानवर सुरक्षा खर्चाचा मोठा बोजा पडत आहे. परकीय गुंतवणूक कमी होत आहे, उद्योगधंद्यांवर परिणाम होत आहे आणि सामान्य नागरिकांचे जीवन अधिकच कठीण बनत आहे. बेरोजगारी, महागाई आणि अस्थिरता यामुळे देशातील अंतर्गत परिस्थितीही चिंताजनक बनली आहे. या परिस्थितीत पाकिस्तानने आपली नीती बदलणे अत्यावश्यक आहे. दहशतवादाला ‘साधन’ म्हणून वापरण्याऐवजी त्याविरुद्ध ठोस आणि प्रामाणिक कारवाई करणे गरजेचे आहे. अफगाणिस्तानसोबत संवाद वाढवून, सीमावाद सोडवण्याचा प्रयत्न करणेही महत्त्वाचे आहे. यासाठी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता आहे.

तसेच, या संघर्षातून इतर देशांसाठीही एक महत्त्वाचा धडा मिळतो—दहशतवाद कधीही नियंत्रणात राहणारा घटक नाही. तो एकदा निर्माण झाला की, तो सीमांच्या पलीकडे जाऊन सर्वांनाच त्रास देतो. अल्पकालीन फायद्यासाठी घेतलेले निर्णय दीर्घकालीन संकट निर्माण करतात. शेवटी, पाकिस्तान–अफगाणिस्तान संघर्ष हा केवळ दोन देशांमधील प्रश्न नाही, तर तो जागतिक सुरक्षेशी निगडित आहे. दहशतवाद, सीमावाद आणि राजकीय अस्थिरता यांचा एकत्रित परिणाम म्हणून हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. पाकिस्तानने पाळलेले ‘साप’ आता त्यालाच डसत आहेत, आणि हीच त्याच्या धोरणात्मक चुकांची सर्वात मोठी किंमत आहे. भविष्यात स्थैर्य हवे असेल, तर भूतकाळातील चुका स्वीकारून नवे, पारदर्शक आणि जबाबदार धोरण स्वीकारणे हाच एकमेव मार्ग आहे.

# नागरिकांच्या अडचणींना प्राधान्य; प्रशासनाने कामे गतीने पूर्ण करावीत – महापौर

## इ क्षेत्रीय कार्यालयातील आढावा बैठकीत विविध विभागांना स्पष्ट सूचना; मूलभूत सुविधांवर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा जलद, सक्षम आणि परिणामकारक पद्धतीने उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांच्या अडचणी प्राधान्याने सोडवून विकासकामांना गती देणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

इ क्षेत्रीय कार्यालयातील संत ज्ञानेश्वर महाराज सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत आरोग्य विभागासह विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरातील प्रलंबित कामे, नागरिकांच्या तक्रारी आणि सुरू असलेल्या विकास प्रकल्पांची सद्यस्थिती यावर व्यापक चर्चा करण्यात आली.



बैठकीस विधी समितीच्या सभापती राणी माई पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य नितीन काळजे, नगरसदस्या सारीका गायकवाड, अर्चना सस्ते, श्रुती डोळस, नानी उर्फ हिराबाई घुले, भिमाबाई फुगे, कविता भोंगाळे, प्रा. सोनाली गव्हाणे तसेच नगरसदस्य सचिन तापकीर, कृष्णा सुरकुले, उदय गायकवाड, सागर गवळी, जालिंदर शिंदे आणि विराज लांडे उपस्थित होते.

यावेळी आरोग्य विभागाचे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत आरोग्य, स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, कर संकलन आणि विद्युत विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला.

नगरसदस्यांनी मांडलेल्या स्थानिक समस्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, स्वच्छता व आरोग्य सेवा अधिक प्रभावी करणे, जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करणे आणि पायाभूत सुविधांच्या कामांना गती देणे यावर विशेष भर देण्यात आला.

प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा देणे, तसेच सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# बाजार समित्यांच्या आधुनिकीकरणाला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्रातील कृषी बाजार व्यवस्थेला आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेचे (ADB) सहकार्य मिळण्याच्या दृष्टीने पणन मंत्री जयकुमार रावल यांचा मनीला दौरा महत्त्वपूर्ण ठरला आहे. ‘आशिया आणि पॅसिफिक अन्न प्रणाली मंच २०२६’ मध्ये सहभागी होत त्यांनी राज्यातील ‘महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट)’ प्रकल्प, मुंबई आंतरराष्ट्रीय कृषी बाजार (एमआयएएम) तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणावर विशेष भर दिला.

या दौऱ्यात मंत्री रावल यांनी एडीबीचे उपाध्यक्ष यिंगमिंग यांग यांची भेट घेऊन कृषी मूल्य साखळी अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि शाश्वत करण्याबाबत चर्चा केली. तसेच एडीबीचे महासंचालक विनफ्रेड विकलेन आणि सीनियर सेक्टर डायरेक्टर कविंगफेंग झांग यांच्यासोबतही महत्त्वपूर्ण बैठक झाली. या चर्चेत कृषी पायाभूत सुविधा, काढणीनंतरचे व्यवस्थापन (पोस्ट हार्वेस्ट मॅनेजमेंट) आणि कृषी-लॉजिस्टिक्स क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी एडीबीच्या सहकार्याबाबत सकारात्मक संकेत मिळाले. या दौऱ्यामुळे राज्यातील कृषी बाजारपेठ अधिक आधुनिक, कार्यक्षम आणि शाश्वत बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना मिळणार असल्याचा विश्वास मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

# ‘सखी आंगण’उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

## आमदार अमित गोरखे यांची आयुक्तांना भेट; आकुर्डी पॅटर्न ठरतोय राज्यासाठी आदर्श

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या ‘सखी आंगण’ या महिला सक्षमीकरण उपक्रमाची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत विशेष कौतुक केले आहे. या उपक्रमाबद्दल पाठवलेले शुभेच्छा पत्र आमदार अमित गोरखे यांनी महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना भेटून सुपूर्द केले.



आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात उभारण्यात आलेल्या ‘सखी आंगण’मध्ये ई-लिलाव प्रक्रियेद्वारे ४९ गाळे महिला बचत गटांना देण्यात आले आहेत. या माध्यमातून महिलांना खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या विक्रीसाठी सुसज्ज व सुरक्षित व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यामुळे महिलांना स्वावलंबनाची संधी मिळून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे.

आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, “हा उपक्रम केवळ व्यवसायापुरता मर्यादित नसून महिलांच्या आत्मविश्वास आणि कौशल्य विकासाला चालना देणारा आहे.” विशेष म्हणजे, या प्रकल्पाच्या सुशोभीकरणासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. ‘सखी आंगण’मधील भिंतींवर महाराष्ट्रातील थोर महिलांचे कार्य आणि विदर्भातील पारंपरिक गोंडी चित्रकलेचे साकारलेले चित्रण या उपक्रमाला सांस्कृतिक समृद्धी प्रदान करते.

या भेटीदरम्यान शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक शिस्त आणि विकासकामांबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास अधिक गतीने होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

‘सखी आंगण’ हा उपक्रम राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त होत असून, पिंपरी-चिंचवड शहरासाठी हा अभिमानाचा विषय ठरत आहे.

## टाकाऊ वस्तूंमधून साकारेल सर्जनशीलतेचा उत्सव

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची ‘वेस्ट टू वंडर’ स्पर्धा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : जागतिक पुनर्वापर दिनाचे औचित्य साधत पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी ‘वेस्ट टू वंडर’ या अभिनव स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेमुळे टाकाऊ वस्तूंना नवसंजीवनी देत त्यातून आकर्षक व उपयुक्त कलाकृती साकारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.




महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आरोग्य विभागामार्फत आयोजित करण्यात आली आहे. उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली या उपक्रमाची अंमलबजावणी होत आहे.

महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत ३२ प्रभागांमध्ये ही स्पर्धा राबविण्यात येणार असून, शहर स्वच्छतेबरोबरच सर्जनशीलतेला वाव देण्याचा दुहेरी उद्देश यामागे आहे. विशेष म्हणजे, कचरा संवेदनशील ठिकाणांचे नाविन्यपूर्ण आणि आकर्षक रूपांतर करण्यावर भर दिला जाणार आहे. यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये सौंदर्यीकरण होण्यास मदत होणार आहे.

या स्पर्धेमुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्याबरोबरच टाकाऊ वस्तूंच्या पुनर्वापराबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल. प्रत्येक प्रभागातून विविध कल्पक कलाकृती साकारल्या जाणार असून, शहरभर एक वेगळाच सर्जनशील आणि आकर्षक माहोल निर्माण होणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी दिलेल्या लिंकद्वारे नोंदणी करणे आवश्यक असून, नोंदणीची अंतिम मुदत २४ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा महापालिकेने व्यक्त केली आहे.

महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, “वेस्ट टू वंडर स्पर्धेमुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेसोबतच सर्जनशीलतेची जाणीव निर्माण होईल. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून शहर अधिक सुंदर बनविण्याचा हा प्रयत्न आहे.” तर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नमूद केले की, “हा उपक्रम केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून, नागरिकांमध्ये वसुंधरापूरक सवयी रुजविण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.” एकूणच, ‘वेस्ट टू वंडर’ ही स्पर्धा शहराच्या सौंदर्यात भर घालणारी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना देणारी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सवात दिग्गजांची सुरेल मैफल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शास्त्रीय संगीताच्या सुरांनी भारलेल्या पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दिग्गज कलाकारांच्या सादरीकरणाने रसिकांना अविस्मरणीय संगीत पर्वणी लाभली. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित या महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित रसिकांनी कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

महोत्सवाची सुरुवात पंडित राम शंकर यांच्या गायनाने झाली. राग शुद्ध कल्याणपासून सुरू झालेल्या त्यांच्या मैफिलीने सुरेल वातावरण निर्माण केले. विविध रागांच्या सादरीकरणातून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सुयोग कुंडलकर (संवादिनी), चारुदत्त फडके (तबला), पल्लवी पिळणकर व मिलन धाक्रस (तानपुरा) यांनी त्यांना उत्कृष्ट साथ दिली. या प्रसंगी त्यांचा सत्कारही करण्यात आला. यानंतर ज्येष्ठ गायक डॉ. राजा काळे यांनी राग झिंजोटीतील बंदिशींनी कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या सादरीकरणाला पंडित सुधीर नायक (हार्मोनियम) व प्रशांत पांडव (तबला) यांनी समर्थ साथ दिली. तानसेन पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महोत्सवाच्या तिसऱ्या सत्रात पद्मविभूषण डॉ. एन. राजम यांच्या व्हायोलिन वादनाची सर्वांना विशेष उत्सुकता होती. त्यांच्या आगमनाने सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. राग देशच्या सादरीकरणातून त्यांनी रसिकांना स्वर्गीय आनंदाची अनुभूती दिली. रागिनी शंकर (व्हायोलिन) व पंडित अरविंद कुमार आझाद (तबला) यांनी त्यांना साथ दिली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शिरूरमधील दोन बालहत्यांचा उलगडा

**शिरूर** : शिरूर तालुक्यातील दहिवडी येथील मांजरेवस्तीमध्ये 21 महिन्यांपासून गूढ असलेल्या दोन बालकांच्या मृत्यूचा अखेर उलगडा झाला आहे. सुरुवातीला बिबट्याच्या हल्ल्याचा संशय व्यक्त केला जात असला तरी तपासात हे दोन्ही खून एका व्यक्तीने केल्याचे स्पष्ट झाले. 21 जून 2024 आणि 19 मार्च 2025 रोजी घडलेल्या घटनांमध्ये आरोपीने एकाच पद्धतीने हत्या करून बिबट्याचा हल्ला असल्याचा बनाव रचला. दिशाभूल करण्यासाठी पायाचे ठसेही उमटवले होते. पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

### यवत येथे महिलेवर चाकू हल्ला; खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल

**यवत** : यवत परिसरातील नांदुर (ता. दौंड) येथे घरातून बाहेर काढल्याच्या रागातून एका महिलेवर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. पिंकीदेवी प्रल्हादकुमार पासवान (वय ४३) या गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आरोपी राकेशकुमार योगेंद्र पासवान याने "घरातून का काढले?" या कारणावरून वाद घालत गळ्यावर व हातावर वार केले. या प्रकरणी यवत पोलीस ठाणे येथे खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला .

### भीमाशंकरात हेलिकॉप्टर लँडिंगवरून वाद

**मंचर** : श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे भाजपचे खासदार निशिकांत दुबे हेलिकॉप्टरने दर्शनासाठी आल्याने नवीन वाद निर्माण झाला आहे. हेलिकॉप्टर उतरविताना आवश्यक नियम व प्रक्रिया पाळली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नियमानुसार हेलिपॅडसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता तसेच जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र, या प्रक्रियेला बगल देत थेट लँडिंग झाल्याची चर्चा आहे.

---

**विनानिविदा निर्णय रद्द; नव्याने निविदा काढूनच प्रकल्प राबविणार, आयुक्तांचा खुलासा**

# उरुळी देवाची कचरा प्रकल्प प्रस्ताव मागे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**उरुळी देवाची** : उरुळी देवाची येथील कचरा प्रकल्पावरून निर्माण झालेला वाद अखेर निवळला असून, महापालिका प्रशासनाने विनानिविदा पद्धतीने मांडलेला प्रस्ताव मागे घेतला आहे. या निर्णयामुळे राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर निर्माण झालेला तणाव काही प्रमाणात कमी झाला आहे. आता या प्रकल्पासाठी नियमित आणि पारदर्शक निविदा प्रक्रिया राबवूनच पुढील कामकाज करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.



महापालिकेच्या स्थायी समितीसमोर देवाची उरुळी येथील कचरा डेपोमध्ये दररोज ५०० मेट्रिक टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. हा प्रकल्प 'भूमी ग्रीन एनर्जी' या कंपनीला थेट विनानिविदा देण्याची तरतूद असल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला. प्रस्तावानुसार, १०+१० अशा एकूण २० वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिटन ६९० रुपये टिपिंग फी देण्यात येणार होती. यासोबतच दरवर्षी १० टक्के दरवाढ देण्याची अटही नमूद करण्यात आली होती.

या अटींमुळे प्रकल्पाचा एकूण आर्थिक बोजा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षांसह काही सत्ताधारी सदस्यांनीही या निर्णयावर आक्षेप घेतला. काँग्रेसचे सदस्य प्रशांत जगताप यांनी स्थायी समितीत हा विषय कार्यपत्रिकेवर घेण्याची मागणी करत प्रशासनाला जाब विचारला. त्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे आणि गटनेते चंद्रकांत कदम यांनी आयुक्तांवर राजकीय दबावाखाली निर्णय घेतल्याचा गंभीर आरोप केला. या आरोपांमुळे प्रकरण अधिकच चिघळले. दरम्यान, या वादाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, हडपसर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक होते. न्यायालयीन प्रक्रियेच्या दृष्टीनेही प्रशासनावर दबाव होता. नवीन प्रकल्प उभारण्यासाठी साधारणतः ८ ते १० महिने लागणार असल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात विद्यमान कंपनीकडूनच काम करून घेण्याचा विचार करण्यात आला होता. या प्रकल्पासाठी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा खर्च संबंधित ठेकेदाराने उचलायचा होता. मात्र, प्रकल्पाचा कालावधी वाढविणे आणि आर्थिक अटी यामध्ये काही त्रुटी असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे हा प्रस्ताव पुढे नेण्यापूर्वीच मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. आयुक्तांनी स्पष्ट केले की, या प्रकरणात कोणत्याही राजकीय दबावाखाली निर्णय घेतलेला नाही. तसेच, पूर्वी याच कंपनीने केलेल्या बायोमायनिंग प्रकल्पाच्या तुलनेत सध्याच्या निविदांमध्ये कमी दर मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे भविष्यात अधिक स्पर्धात्मक आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्याची गरज असल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे.

आता ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी लवकरच नव्याने निविदा काढण्यात येणार आहे. या प्रक्रियेद्वारे पात्र आणि अनुभवी कंपन्यांना संधी दिली जाईल. त्यामुळे प्रकल्प अधिक पारदर्शक पद्धतीने आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत स्वरूपात राबविला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे कचरा व्यवस्थापनाच्या कामाला गती मिळण्याची शक्यता आहे. उरुळी देवाची आणि हडपसर परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या कचऱ्याच्या समस्येवर लवकरच ठोस तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

---

## भोरवाडीत सोमवारपासून अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी** : : संतांच्या विचारांचा प्रसार आणि समाजात आध्यात्मिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने भोरवाडी (वडगाव कांदळी) येथे सोमवार, दि. २३ ते शुक्रवार, दि. २७ मार्च दरम्यान अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान प्रासादिक मंडळ भोरवाडी आणि कारभारी महाराज भोर यांच्या प्रेरणेने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, दुपारी नियमाचे भजन, सायंकाळी हरिपाठ तसेच सायंकाळी ७ ते ९ या वेळेत हरीकीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन असून रात्री १० नंतर जागर होणार आहे. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. यात ह.भ.प. हनुमान महाराज डांबे (पैठण), ह.भ.प. नवनाथ महाराज माशेरे (अमदाबाद) आणि ह.भ.प. कावेरीताई घुमरे (अपेगाव) यांचा समावेश आहे.

दि. २६ मार्च रोजी रामजन्म निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. किसन महाराज काळे (खोडद) यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी ३ ते ५ या वेळेत महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम, तर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. नरेंद्र महाराज गुरव (मालेगाव) यांचे कीर्तन होणार आहे.

दि. २७ मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. परशुराम महाराज अनर्थे (धोत्रे भोजडे) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता केली जाणार आहे. या भक्तिमय सोहळ्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तिंचे मंडळातर्फे आभार मानण्यात आले आहेत. तसेच सर्व ग्रामस्थ, मुंबईकर, पुणेकर, महिला बचत गट, क्रांतिवीर मित्र मंडळ आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे भास्करशेठ भोर यांनी केले .

---

## कारखाना साखर शाळेसाठी दोन वर्गखोल्या मंजूर; २८ लाखांचा निधी

**ऊसतोड कामगारांच्या मुलांना मोठा दिलासा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : भीमाशंकर सहकारी साखर कारखाना (पारगाव) परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक साखरशाळेत शिक्षण घेणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी शाळेसाठी दोन नवीन वर्गखोल्या मंजूर केल्या असून त्यासाठी तब्बल २८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठी सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

कारखाना परिसरात ऊसतोड कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनत होता. वर्गखोल्यांची अपुरी संख्या ही शाळेची प्रमुख अडचण होती. अनेक वेळा एकाच वर्गात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना बसवावे लागत असल्यामुळे शिक्षकांना अध्यापन करताना अडचणी येत होत्या आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत होता.

या पार्श्वभूमीवर विवेक वळसे पाटील यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी तातडीने दोन नवीन वर्गखोल्यांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. मंजूर निधीतून लवकरच बांधकामाला सुरुवात होणार असून विद्यार्थ्यांना स्वतंत्र, सुरक्षित आणि सुसज्ज वर्गखोल्यांचा लाभ मिळणार आहे.

या निर्णयामुळे ऊसतोड कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या मुलांना चांगल्या सुविधा मिळणार असल्याने पालकांनीही आनंद व्यक्त केला आहे. शाळेतील शिक्षकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत, यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले.

याबाबत माहिती देताना भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी सांगितले की, "ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे."

दरम्यान, ग्रामस्थ, पालक आणि स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत वर्गखोल्यांचे बांधकाम लवकर पूर्ण करून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

---

## अपघातग्रस्त ऋत्विकला समाजाचा आधार; मदतीचा ओघ सुरू

**सामाजिक संस्थांसह ग्रामस्थांचा पुढाकार; व्हीलचेअर, आर्थिक मदत आणि किराणा उपलब्ध**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर** : जुन्नर तालुक्यातील धनगरवाडी येथील ऋत्विक अनिल ढोबळे या अपघातग्रस्त तरुणाला समाजातून मोठा आधार मिळत असून विविध स्तरांतून मदतीचा हात पुढे येत आहे. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात ऋत्विकचा एक पाय गमवावा लागला असून, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या कुटुंबाला या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या ढोबळे कुटुंबावर संकटांचा डोंगर कोसळला असताना सामाजिक बांधिलकी जपत अनेकांनी पुढाकार घेतला. अश्विनी पिंगळे यांनी ही बाब डिसेंट फाउंडेशन पर्यंत पोहोचवल्यानंतर



संस्थेकडून तत्काळ मदत करण्यात आली. फाउंडेशनतर्फे ऋत्विकला व्हीलचेअर देण्यात आली असून पाच हजार रुपयांची रोख मदतही देण्यात आली आहे.

यासोबतच संस्थेचे सदस्य डॉ. अमेय डोके यांच्या माध्यमातून ऋत्विकसाठी पौष्टिक आहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. पुढील एका महिन्यात कुटुंबासाठी शौचालय बांधून देण्याची घोषणाही संस्थेने केली आहे.

दरम्यान, ओतूर येथील दहावी 'क'च्या माजी विद्यार्थ्यांनी तीन ते चार महिने पुरेल इतका किराणा उपलब्ध करून देत मदतीचा हात पुढे केला. तसेच गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत सुमारे ७५ हजार रुपयांची आर्थिक मदत जमा केली असून ती लवकरच कुटुंबाला सुपूर्द करण्यात येणार आहे.

या प्रसंगी जितेंद्र बिडवई यांनी समाजाला आवाहन करताना सांगितले की, "अशा कठीण प्रसंगी जात, पात, धर्म न पाहता समाजाने एकत्र येऊन गरजूंना मदत करणे गरजेचे आहे."

---

## उरुळी कांचनमध्ये गॅस सिलिंडरसाठी ४५ दिवसांची प्रतीक्षा; नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**उरुळी कांचन** : उरुळी कांचन येथे घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी तब्बल ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. मध्य-पूर्व आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आणि नैसर्गिक वायू पुरवठ्यावर परिणाम झाल्याने प्रशासनाने शहरी भागासाठी २५ दिवस आणि ग्रामीण भागासाठी ४५ दिवसांचा बुकिंग कालावधी निश्चित केला आहे. मात्र, वेगाने शहरीकरण झालेल्या हवेली तालुक्याला अजूनही 'ग्रामीण' निकष लागू असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी वाढत आहे.



हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणावर नोकरदार आणि स्थायिक नागरिक वास्तव्यास असूनही गॅस वितरणासाठी दीड महिन्याचा कालावधी लागू असल्याने गृहिणींचे नियोजन कोलमडले आहे. "शहराप्रमाणे सुविधा मिळाव्यात" या मागणीसाठी नागरिकांनी आवाज उठवला आहे. महापालिका व नगरपरिषद क्षेत्रांप्रमाणे येथेही २५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, गॅस वितरण व्यवस्था ऑनलाईन झाल्यानंतर पारदर्शकता वाढेल अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात घरगुती गॅससाठी टंचाई कायम असून काही ठिकाणी व्यावसायिक वापरासाठी घरगुती सिलिंडरचा गैरवापर होत असल्याचेही समोर येत आहे. अन्न व नागरी पुरवठा विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

याशिवाय, वाढती लोकसंख्या आणि बदललेले शहरी स्वरूप लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. गॅस वितरणाचा कालावधी २५ दिवसांपर्यंत कमी करावा तसेच बेकायदेशीर वापरावर कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, पुणे येथे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (CET) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. २४ मार्च ते १६ मेदरम्यान परीक्षा होणार असून यंदा प्रथमच विद्यार्थ्यांना अस्थायी व अंतिम अशी दोन प्रवेशपत्रे देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वीच केंद्राची माहिती मिळणार असल्याने नियोजन सुलभ होणार आहे.

---

## आळंदीतील विविध संस्था व मंदिरांना देणगी; दिवाणे कुटुंबीयांचे सामाजिक दातृत्व

**ज्ञानदीप शिष्यवृत्तीस ५ हजारांची मदत; गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : आळंदी परिसरातील दिवाणे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांना देणगी प्रदान करून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे परिसरात कौतुकाची लाट उसळली असून इतर नागरिकांनाही समाजकार्यात पुढे येण्याची प्रेरणा मिळत आहे.

गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'सुरेश वडगावकर ज्ञानदीप शिष्यवृत्ती' योजनेस दिवाणे कुटुंबीयांनी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. या



मदतीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार मिळणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळकटी मिळणार आहे. कै. अंजनाबाई दिवाणे यांच्या दशक्रिया निमित्त त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही देणगी त्यांच्या ज्येष्ठ पुत्र मनोहर दिवाणे आणि परिवारातील सदस्यांनी विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली. सामाजिक कार्यातून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.

दिवाणे कुटुंबीयांनी केवळ शिष्यवृत्तीपुरतीच मदत न करता आळंदीतील विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनाही आर्थिक सहकार्य केले आहे. यात आळंदी नगरपरिषद अंतर्गत इंद्रायणी स्वच्छता अभियान, श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर, श्री गोविंद महाराज केंद्रे संस्था, 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' परिवार, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, भैरवनाथ मंदिर, श्री हजेरी मारुती मंदिर, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, स्वकुळ साळी समाज ज्ञाती गृह तसेच आळंदी दशक्रिया विधी घाट या संस्थांचा समावेश आहे.

या उपक्रमातून धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांना चालना मिळत असून समाजातील विविध घटकांना त्याचा थेट लाभ होत आहे. दिवाणे कुटुंबीयांच्या या योगदानामुळे सामाजिक ऐक्य आणि सेवाभावाची भावना अधिक दृढ होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

परिसरातील नागरिक, ग्रामस्थ आणि विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी दिवाणे कुटुंबीयांच्या या कार्याचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडण्यास मदत होत असल्याची भावना व्यक्त केली आहे.

---

**पालखी मिरवणूक, ग्रामप्रदक्षिणा व सामुदायिक पठण; गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले**

## पाबळमध्ये स्वामी समर्थ महाराज प्रकट दिनानिमित्त भव्य सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ** : पाबळ येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला पालखी सोहळा आणि ग्रामप्रदक्षिणा कार्यक्रम मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. दिवसभर चाललेल्या या धार्मिक कार्यक्रमामुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

अखिल भारतीय स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित श्री गुरुपीठ, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर (पाबळ) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री स्वामी



समर्थ सेवा केंद्र पाबळ यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ ते ८.३० या वेळेत पारंपरिक भूपाळी आरती आणि अभिषेकाने करण्यात आली. या मंगलमय वातावरणात झालेल्या धार्मिक विधींनी भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा प्रदान केली.

यानंतर स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीची गावभर भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदुंगाचा नाद आणि "जय जय रघुवीर समर्थ" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गावातील प्रत्येक चौकात पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांनीही मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला.

ग्रामप्रदक्षिणेदरम्यान विविध ठिकाणी भाविकांनी फुलांची उधळण करत पालखीचे स्वागत केले. या सोहळ्यामुळे गावातील सामाजिक एकोपा आणि धार्मिक एकात्मतेचे सुंदर दर्शन घडले. पालखी सोहळ्यानंतर ग्रामस्थांनी एकत्र येत 'श्री स्वामी चरित्र सारामृत' या ग्रंथाचे सामुदायिक पठण केले. या सामूहिक उपक्रमामुळे वातावरण अधिकच पवित्र आणि भक्तिमय झाले. त्यानंतर पाबळसह पंचक्रोशीतील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते, यामुळे कोणतीही अडचण न येता सोहळा यशस्वीपणे पार पडला.

दत्तावतारी सद्गुरु स्वामी समर्थ महाराज यांच्या शिकवणीचा प्रसार व्हावा, तसेच समाजात सद्भावना, सेवा आणि अध्यात्मिक जागरूकता वाढावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य सोहळ्याला ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आयोजकांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे हा धार्मिक सोहळा सर्वार्थाने यशस्वी ठरला.

---

## घराच्या वाटणीवरून मुलाकडून आई-वडिलांना बेदम मारहाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड** : घराच्या वाटणीच्या वादातून मुलगा आणि सुनेने स्वतःच्या आई-वडिलांवर काठीने हल्ला करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना दौंड तालुक्यातील नायगाव येथे घडली आहे. या प्रकरणी आरोपी मुलगा अमोल संजय काळे आणि सून प्रियंका अमोल काळे यांच्याविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (ता. १६) सायंकाळी साडेसातच्या सुमारास फिर्यादी मालन संजय काळे या पतीसह घरासमोर उभ्या होत्या. त्यावेळी त्यांचा मुलगा अमोल व सून प्रियंका तेथे आले. अमोलच्या हातात लाकडी काठी होती. घरातील हिस्स्याच्या मागणीवरून वादाला सुरुवात झाली. आईने समजावून सांगण्याचा प्रयत्न केल्यावर अमोलने संतापून शिवीगाळ करत वडील संजय काळे यांच्यावर काठीने जोरदार हल्ला केला. त्यांच्या डोक्यावर, पाठीवर आणि हातावर प्रहार करण्यात आले. पतीला वाचवण्यासाठी पुढे आलेल्या मालन काळे यांनाही आरोपींनी मारहाण केली. यावेळी "जिवंत सोडणार नाही" अशी धमकी देत दोघेही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेत मालन काळे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी दौंड पोलिसांनी दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार म्हेत्रे करीत आहेत.

## सारांश वृत्त

### भारत-चीन थेट विमानसेवा पुन्हा सुरू

**श्रीनगर :** नवी दिल्ली-बीजिंग दरम्यानची थेट विमानसेवा लवकरच पुन्हा सुरू होणार असून, एअर चायना ही सेवा चालवणार आहे. यायनीज असेंबसी इन इंडिया कडून याबाबत पुष्टी करण्यात आली आहे. २०२० मधील सीमावादानंतर बंद झालेली ही सेवा आता सहा वर्षांनी पुन्हा सुरू होत आहे. याआधी शांघाई दिल्ली फ्लाइटही सुरू झाली होती. या निर्णयामुळे व्यापार, पर्यटन आणि दोन्ही देशांतील संबंध सुधारण्यास मोठी चालना मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### हिमाचलमध्ये मुसळधार बर्फवृष्टी; जनजीवन विस्कळीत

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील उंच भागांत जोरदार हिमवृष्टी तर खालच्या भागांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. लाहौल, रोहतांग, कुंजम दर्रा आणि शिंकुला परिसरात ७० ते ९० सेंमीपर्यंत बर्फ साचल्याने अनेक रस्ते बंद झाले आहेत. शिमला, कांगडा, मंडी आदी भागांत पावसाची नोंद झाली असून तापमानात मोठी घट झाली आहे. मनाली-केलांगसह सुमारे १०० रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत, तर काही भागांचा संपर्क तुटला आहे. भूस्खलन आणि हिमखंड कोसळल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील दोन दिवस हलक्या हिमवृष्टीचा अंदाज व्यक्त करत ३००० मीटरपेक्षा अधिक उंचीवर हिमस्खलनाचा इशारा दिला आहे.

### गुजरातमध्ये भोंदूबाबाचा पर्दाफाश; आश्रमात नकली नोटांचा कारखाना

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये एका भोंदूबाबाच्या आश्रमात चालणाऱ्या नकली नोटांच्या रॅकेटचा मोठा भांडाफोड झाला आहे. सुरतजवळील कामरेज तालुक्यातील पारडी येथील 'श्री सत्य योग फाउंडेशन' आश्रमात धर्माच्या आडून बनावट नोटा छापल्या जात असल्याचे उघड झाले. अहमदाबाद गुन्हे शाखेने कारवाई करत ५०० रुपयांच्या ४० हजारांहून अधिक नोटा, सुमारे २ कोटींचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींकडून प्रिंटिंग मशीन, संगणक व साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

## अमेरिका-इस्त्रायलचा संयुक्त हल्ला

# युद्धात अमेरिकेचा सर्वात मोठा विजय!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या भीषण युद्धाने आता निर्णायक टप्पा गाठला असून, युद्धाच्या २२व्या दिवशी इराणला मोठा धक्का बसल्याची माहिती समोर आली आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणमधील नतांज येथील प्रमुख अणु ऊर्जा केंद्रावर हल्ला केल्याने मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे.

नतांज हे इराणमधील सर्वात महत्त्वाचे यूरेनियम संवर्धन केंद्र मानले जाते. तेहरानपासून सुमारे २०० किलोमीटर अंतरावर असलेल्या या केंद्रावर झालेला हा हल्ला रणनीतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर प्रथमच या केंद्राला लक्ष्य करण्यात आले असून, यामुळे इराणच्या अणु कार्यक्रमावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या हल्ल्यानंतर मोठ्या प्रमाणात रेडिएशन उत्सर्जन होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. मात्र, इराणी प्रसारमाध्यमांनी कोणतेही घातक रेडिएशन बाहेर पडले नसल्याचे स्पष्ट केले आहे. तरीदेखील या घटनेने आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जर रेडिएशनचा प्रसार झाला असता, तर संपूर्ण परिसरात मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. इराणने या हल्ल्याचा तीव्र निषेध करत अमेरिका आणि इस्त्रायलवर आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. इराणचे अणु ऊर्जा प्रमुख मोहम्मद इस्लामी यांनी या संदर्भात आंतरराष्ट्रीय अणु ऊर्जा संस्थेला पत्र लिहून तक्रार नोंदवली आहे. इराणच्या मते, हा हल्ला केवळ लष्करी कारवाई नसून जागतिक सुरक्षेलाही गंभीर धोका निर्माण करणारा आहे. दरम्यान, या संघर्षात अमेरिका आणि इस्त्रायलला काही प्रमाणात रणनीतिक यश मिळाल्याचे दिसत असले तरी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे चित्र नाही. इराणकडूनही प्रत्युत्तरादाखल हल्ले सुरूच असून, त्यामध्ये इस्त्रायल आणि अमेरिकेच्या काही सैन्य तळांना नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. काही हल्ल्यांमध्ये अमेरिकन सैनिकांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले आहे. या सर्व घडामोडींमुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः अणु केंद्रांवर हल्ले झाल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. तज्ज्ञांच्या मते, या संघर्षामुळे जागतिक राजकारणावर तसेच अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम होऊ शकतो. कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम जागतिक बाजारपेठांवर होणार आहे.

या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय समुदायाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याची गरज व्यक्त केली जात आहे. संयुक्त राष्ट्र संघ आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्था या संघर्षावर तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेतील का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. सध्या तरी युद्ध थांबण्याची कोणतीही चिन्हे दिसत नसून, पुढील काही दिवसांत हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अत्यंत नाजूक बनली असून, जगभरातील देश या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## पत्नी नोकराणी नाही"; घटस्फोट प्रकरणात सुप्रिम कोर्टाचे निरीक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** घटस्फोटासंदर्भातील एका महत्त्वपूर्ण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, पत्नी घरकाम करत नाही म्हणून तिला 'क्रूर' ठरवता येणार नाही. "तुम्ही नोकराणीशी नव्हे, तर जीवनसाथीशी लग्न करता," असे ठळक निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

या प्रकरणात पतीने पत्नीवर घरकाम न करणे, स्वयंपाक न करणे आणि वागणुकीत बदल झाल्याचा आरोप करत घटस्फोटाची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने या कारणांना 'क्रूरता' मानण्यास नकार दिला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, बदलत्या काळानुसार वैवाहिक नातेसंबंधांची व्याख्या बदलली आहे. घरातील कामे ही केवळ पत्नीची जबाबदारी नसून पतीनेही त्यात समान सहभाग घ्यावा लागतो.

"स्वयंपाक, साफसफाई, धुणीभांडी ही कामे दोघांनी मिळून करावीत. आजच्या काळात जबाबदाऱ्या वाटून घेणे आवश्यक आहे," असेही न्यायालयाने नमूद केले. या निर्णयातून न्यायालयाने पारंपरिक विचारसरणीला छेद देत आधुनिक कुटुंब व्यवस्थेत समानतेचा संदेश दिला आहे. विवाह हा 'भागीदारी' आहे, कोणत्याही एकावर जबाबदारी टाकणारा करार नाही, हेही न्यायालयाने अधोरेखित केले. तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून भविष्यातील वैवाहिक वादांमध्ये महत्त्वाचा संदर्भ ठरणार आहे. घरगुती जबाबदाऱ्या वाटून घेण्याची संकल्पना अधिक बळकट करण्यास या निरीक्षणामुळे मदत होणार आहे.

एकूणच, सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे विवाहातील समानता, परस्पर सन्मान आणि जबाबदारी वाटून घेण्याचा संदेश अधिक ठळकपणे समोर आला आहे.

## होर्मुझ संकटावर भारताचा 'प्लॅन बी'; पर्यायी सागरी मार्गांचा शोध सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात इराण, इस्त्रायल आणि यूएसए यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू असलेल्या या संघर्षात इराणने सागरी मार्गावर कडक नियंत्रण ठेवले आहे.

या परिस्थितीमुळे भारताच्या इंधन पुरवठ्याला धोका निर्माण झाला होता. मात्र भारत-इराण चर्चेनंतर भारतीय जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी मिळाल्याने सध्या तेल व गॅस पुरवठा सुरळीत सुरू आहे. तरीही भविष्यातील अनिश्चितता लक्षात घेता भारताने पर्यायी मार्गांचा शोध सुरू केला आहे.

भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या आता पश्चिम आफ्रिका आणि आशिया-पॅसिफिक भागातील देशांकडून तेल खरेदी करण्यावर भर देत आहेत. तसेच एक्झोनमोबाईल कडूनही मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करण्यात आले आहे.

याशिवाय इंडियन ऑयल कॉर्पो. पश्चिम आफ्रिकेतून तेल आयात वाढवण्यासाठी चर्चेत आहे. या पावलांमुळे भारताचे आखाती देशांवरील सुमारे ४५ टक्के अवलंबित्व कमी होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, मे महिन्यापासून भारताचे होर्मुझवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या घटू शकते. त्यामुळे युद्धजन्य परिस्थितीतही भारताच्या ऊर्जा सुरक्षेला मोठा आधार मिळणार आहे. एकूणच, जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारताने वेळेवर पर्यायी मार्ग शोधत ऊर्जा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

## एलपीजी टंचाईवर उपाय; व्यावसायिक गॅस कोट्यात २०% वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आखाती प्रदेशातील युद्धामुळे निर्माण झालेल्या एलपीजी गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने व्यावसायिक एलपीजी ग्राहकांसाठी गॅस कोट्यात २० टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केली आहे. हा निर्णय २३ मार्च २०२६ पासून लागू होणार असून, त्यामुळे एकूण गॅस पुरवठा संकटपूर्व पातळीच्या सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे.

पेट्रोलियम मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र पाठवून या निर्णयाची माहिती दिली आहे. या वाढीव गॅस कोट्याचा फायदा मुख्यतः सामान्य जनतेशी संबंधित व्यवसायांना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यात रेस्टॉरंट्स, रस्त्यावरील ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कँटीन तसेच फूड प्रोसेसिंग आणि दुग्ध उद्योगांचा समावेश आहे.

तसेच, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालवल्या जाणाऱ्या सवलतीच्या कँटीन व सामुदायिक स्वयंपाकगृहांना प्राधान्य देण्यावर भर देण्यात आला आहे. स्थलांतरित कामगारांच्या गरजा लक्षात घेऊन ५ किलो एफटीएल सिलिंडरचा पुरवठा सुनिश्चित करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

यापूर्वी गॅस टंचाईमुळे राज्यांना केवळ २० टक्के कोटा दिला जात होता. त्यानंतर १८ मार्च रोजी पीएनजी विस्ताराला चालना देणाऱ्या राज्यांना अतिरिक्त १० टक्के कोटा देण्यात आला होता. आता नव्या २० टक्के वाढीमुळे एकूण पुरवठा ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे.

मात्र, या सुविधेचा लाभ घेण्यासाठी व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ग्राहकांचा संपूर्ण डेटा तयार करून गॅसचा वापर आणि वार्षिक गरज याची माहिती देणे आवश्यक राहणार आहे.

या निर्णयामुळे बाजारातील गॅस टंचाई काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता असून, लघु उद्योग आणि सेवा क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

## रियाधमध्ये भारतीयाचा मृत्यू; दूतावासाकडून मदतीचा हात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अहमदाबाद :** रियाध येथे १८ मार्च रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेत एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, याबाबत भारतीय दूतावासाने शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. दूतावासाने मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांशी तसेच स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्क ठेवत आवश्यक ती मदत पुरविण्याचे आश्वासन दिले आहे.

"रियाध येथे अलीकडे घडलेल्या घटनेत एका भारतीय नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या दुःखद प्रसंगाबद्दल आम्ही मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो. कुटुंबीयांशी संपर्कात राहून आवश्यक ती सर्व मदत करण्यात येत आहे."

"रियाधमधील हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. संबंधित कुटुंबीयांप्रती आम्ही सहवेदना व्यक्त करतो. स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून पार्थिव भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत."

या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, विविध घटनांमध्ये आतापर्यंत सहा भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून एक नागरिक अद्याप बेपत्ता आहे. सौदी अरेबिया, ओमान, इराक आणि संयुक्त अरब अमिरातीतील भारतीय दूतावास संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शोधमोहीम आणि पार्थिव परताव्यासाठी प्रयत्न करत आहेत.

या घटनेमुळे परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, सरकारकडून आवश्यक ती सर्व मदत केली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे इंधन टंचाई

# इराण-इस्रायल युद्धाचा भारताला आर्थिक फटका; रुपया घसरून ९३ वर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण-इस्रायल युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असून भारतालाही त्याची मोठी झळ बसताना दिसत आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने स्ट्रेट ऑफ होर्मूज ही महत्त्वाची समुद्री वाहतूक मार्गिका काही काळासाठी बंद केली होती. त्यामुळे अनेक देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली. नंतर भारत आणि चीनसारख्या मित्र राष्ट्रांसाठी हा मार्ग खुला करण्यात आला असला, तरी अमेरिका व पश्चिमेकडील देशांसाठी निर्बंध कायम आहेत.

या घडामोडींमुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून भारतात गॅस सिलिंडरच्या दरात वाढ आणि काही भागांत टंचाई जाणवत आहे. काही ठिकाणी प्रीमियम पेट्रोलचे दरही वाढल्याची माहिती समोर येत आहे.


दरम्यान, या संकटाचा सर्वाधिक परिणाम भारतीय चलनावर झाला आहे. शुक्रवारी रुपयाचे मूल्य घसरून प्रति डॉलर ९३ रुपयांवर पोहोचले, ही आतापर्यंतची सर्वात मोठी घसरण मानली जात आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या दरामुळे डॉलर मजबूत होत असून, त्याचा थेट परिणाम रुपयावर होत आहे.

याचबरोबर भारताच्या परकीय चलनसाठ्यातही सलग दुसऱ्या आठवड्यात घट नोंदवली गेली आहे. यावेळी सुमारे ७.६७८ अब्ज डॉलरची घट झाली असून, मागील आठवड्यातही साठा कमी झाला होता. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) खुल्या बाजारात डॉलर विक्री करत असल्याचे वृत्त आहे.

एकूणच, हे युद्ध भारतासाठी थेट लष्करी नसले तरी आर्थिकदृष्ट्या मोठे आव्हान ठरत आहे. इंधन दरवाढ, रुपयाची घसरण आणि परकीय चलनसाठ्यातील घट यामुळे आगामी काळात अर्थव्यवस्थेवर अधिक दबाव येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सोनं-चांदी स्वस्त! सराफ बाजारात घसरणीचा ट्रेंड कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन :** सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा एकदा घसरण पाहायला मिळाली असून, ग्राहकांसाठी खरेदीची चांगली संधी निर्माण झाली आहे. विशेषतः चांदीच्या किमतीत मोठी घसरण नोंदवली गेली असून, काही ठिकाणी दर तब्बल ३ ते ४ हजार रुपयांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे.

सोन्याच्या दरातही नरमाई दिसून येत असून, मागील काही दिवसांत मोठ्या प्रमाणात दर घसरले आहेत. मार्च महिन्यातच सोन्याच्या किमतीत सुमारे १० ते ११ टक्क्यांची घट झाल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

मुंबई बाजाराचा विचार केला तर २४ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १.४८ ते १.५२ लाख रुपये प्रति १० ग्रॅमच्या आसपास आहे, तर २२ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १.४५ लाख रुपयांच्या आसपास असल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे, चांदीचा दरही घसरत असून मुंबईत सुमारे २.७५ ते २.८० लाख रुपये प्रति किलोच्या आसपास व्यवहार होत असल्याचे दिसून येते. या घसरणीमागे आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी महत्त्वाच्या ठरत आहेत. इराण-इस्रायल संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता वाढली असली तरी मजबूत झालेला अमेरिकन डॉलर आणि नफावसुली यामुळे सोन्या-चांदीवर दबाव आला आहे.

तज्ज्ञांच्या मते, सध्या बाजारात अस्थिरता कायम असून दरात चढ-उतार सुरूच राहण्याची शक्यता आहे. मात्र, दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी ही घसरण खरेदीची संधी ठरू शकते.

एकूणच, सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सोनं-चांदी स्वस्त झाल्याने ग्राहकांसाठी ही दिलासादायक बातमी ठरत आहे.

### ओवेसींची मोदींवर टीका

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक तणाव वाढला असून होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्याने भारतासह अनेक देशांमध्ये ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. भारतात सुरुवातीला एलपीजीचा तुटवडा जाणवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध देशांच्या प्रमुखांशी दूरध्वनीवरून संवाद साधत शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दरम्यान, हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी या मुद्द्यावरून मोदींवर टीका करत इस्रायल आणि पाकिस्तानलाही टोला लगावला आहे.

## होर्मुझ तणावावर युरोप-जपान सक्रिय; सुरक्षित जलवाहतुकीसाठी संयुक्त पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाढता तणाव हाताळण्यासाठी युरोप आणि जपान महत्त्वपूर्ण कारवाई करतील असे संकेत दिले आहेत. मधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युरोपातील प्रमुख देश आणि जपान यांनी संयुक्त कारवाईचे संकेत दिले आहेत. या निवेदनात इराणकडून व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

ड्रोन आणि स्फोटक बोटींच्या हल्ल्यांमुळे सामुद्रधुनीतील जलवाहतूक विस्कळीत झाली असून शेकडो जहाजे अडकून पडली आहेत.

तसेच कतार आणि सौदी अरेबियामधील तेल व वायू प्रकल्पांवरील हल्ल्यांमुळे ऊर्जा पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. कतारच्या एलएनजी निर्यात क्षमतेच्या सुमारे १७ टक्क्यांवर परिणाम झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित देशांनी ऊर्जा बाजार स्थिर ठेवण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी उत्पादक देशांसोबत समन्वय साधण्याचे आश्वासन दिले आहे. इराणला तातडीने हल्ले थांबवण्याचे आणि प्रादेशिक स्थैर्य राखण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरता आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर धोका ठरत असल्याने या संयुक्त उपक्रमाकडे जगाचे लक्ष लागले आहे.

## तेलपुरवठा, जहाज वाहतूक आणि भारतीयांच्या सुरक्षेवर चर्चा; वाढत्या तणावामुळे भारतालाही फटका

# इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींचा इराण राष्ट्रपतींना फोन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने कूटनीतिक हालचाली वेगवान केल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्रपती डॉ. मसुद पेझेशकियान यांच्याशी थेट दूरध्वनीवरून चर्चा करत महत्त्वाच्या मुद्द्यांवर संवाद साधला. या चर्चेत प्रामुख्याने तेलपुरवठा, जहाज वाहतूक आणि प्रादेशिक स्थैर्य यावर भर देण्यात आला.

सध्या इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव वाढत असून, या संघर्षामुळे संपूर्ण आखाती प्रदेशात अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकेच्या समर्थनासह इस्रायलने इराणवर हल्ले केल्याचे वृत्त असताना, इराणनेही सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कुवैतमधील तेल प्रकल्पांना लक्ष्य केल्याने जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. याचा थेट परिणाम भारतावर होत असून, कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत.

विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने तेलवाहू जहाजांची ये-जा विस्कळीत झाली आहे. परिणामी देशात घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढले असून पेट्रोल-डिझेल दरवाढीची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संकटावर मात करण्यासाठी भारताने रशिया, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेकडून पर्यायी तेल खरेदी सुरू केली आहे.

दरम्यान, मोदी आणि पेझेशकियान यांच्यातील चर्चेत सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्याची आशा व्यक्त करण्यात आली. मोदी यांनी ईद आणि नवरोजच्या शुभेच्छा देत, पश्चिम आशियात पुन्हा शांततेचे वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

तसेच या संवादात पंतप्रधान मोदी यांनी जहाज वाहतुकीचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी समुद्री मार्ग खुले आणि सुरक्षित राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इराणमधील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत सहकार्य केल्याबद्दल भारताने इराणचे आभारही मानले.

या उच्चस्तरीय संवादामुळे भारताने कूटनीतिक स्तरावर सक्रिय भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. वाढत्या युद्धजन्य परिस्थितीत ऊर्जा सुरक्षितता, व्यापार आणि नागरिकांच्या संरक्षणासाठी भारत पुढाकार घेत असल्याचे या घटनेतून दिसून येते. पुढील काळात या चर्चेचा तेलपुरवठा आणि प्रादेशिक स्थैर्यावर काय परिणाम होतो, याकडे जगाचे लक्ष लागले आहे.